| | |
|---|---|
| MHSI04000241-2025 | दाखल तारीख : ०४.०४.२०२५<br>नोंदणी तारीख : ०४.०४.२०२५<br>निकाल तारीख : ०६.०७.२०२६<br>कालावधी : वर्षे महिने दिवस<br>०१ ०३ ०२ |

**कुडाळ येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी - एन.ए.बकरे)

**फौजदारी किरकोळ अर्ज क्र.२५/२०२५** **निशाणी क्र.८**

१. रोहिणी रावजी तुळसकर, }
पु.श्र. संगिता आनंद नारिंग्रेकर, } **...अर्जदार**
वयः- २८ वर्षे, व्यवसायः- काही नाही, }
रा. नेरुर, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. }

**विरुध्द**

१. रावजी गणपत तुळसकर, }
वयः- ३३ वर्षे, व्यवसायः- डंपर चालक, } **... सामनेवाला**
रा. सरंबळ, देऊळवाडी, }
ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग. }

---

**अर्जः-** भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४ अंतर्गत.

---

---

अर्जदारातर्फे वकील :- ॲड. श्री. आर.डी.बिले

सामनेवालातर्फे वकील :- एकतर्फा

---

## –::–न्यायनिर्णय–::–

### ( घोषित दिनांक :०६.०७.२०२६ )

प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदार हिने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४ अन्वये दाखल केला असून, त्यामध्ये सामनेवाला याचेकडून अर्ज दाखल तारखेपासून दरमहा रक्कम रुपये १०,०००/– प्रमाणे पोटगी स्वरुपात रक्कम मिळावी. तसेच नुकसानभरपाई खर्च याकरीता रक्कम रुपये ५,०००/– व अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/– सामनेवाला याचेकडून मिळावा ही विनंती केलेली आहे.

**अर्जदार हिचे थोडक्यात कथन असे की–**

२. अर्जदार व सामनेवाला हे नात्याने पती–पत्नी असून, त्यांचा विवाह हिंदू विवाह पध्दतीनुसार दि.१४.०८.२०१८ रोजी नेरुर येथील कलेश्वर मंगल कार्यालय येथे झाला. सदरील विवाह हा प्रेमविवाह असून, सदर विवाहापासून अर्जदार व सामनेवाला यांना भावेश नावाचा मुलगा आहे. सदर विवाहानंतर अर्जदार ही सामनेवाला याचेसोबत नांदणेकरीता गांव मौजे सरंबळ येथे सामनेवाला याचे घरी आली. त्यावेळी सामनेवाला याचे घरी सामनेवाला याचे आई–वडील व सामनेवाला अशी माणसे राहण्यास होती.

३. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, सामनेवाला याने सुरुवातीपासुनच वाईट वागण्यास सुरुवात केली. सामनेवाला यास दारुचे व्यसन होते. सामनेवाला हा दिवस–रात्र दारु पित होता. तसेच अशा परिस्थितीत सामनेवाला हा कधी काळी रात्री अपरात्री घरी येत नसे. याबाबत अर्जदार हिने सामनेवाला यास विचारणा केली असता, सामनेवाला याने तो कामावर गेलो आहे असे खोटे सांगायचा. तसेच सामनेवाला हा बारीक–सारीक गोष्टींवरुन अर्जदार हिचेवर संशय घेऊन अर्जदार ही कोणाबरोबरही बोलली तरी सुध्दा "तुझी त्याच्याबरोबर भानगड आहे."

असे बोलायचा. त्यामुळे अर्जदार हिला तिचे नातेवाईक यांचेसोबत देखील बोलणे मुश्कील झाले होते.

४. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, अशा परिस्थितीमध्ये अर्जदार हिला सामनेवाला याचेपासून दिवस गेले. त्यावेळी सामनेवाला याला देखील आनंद झाला होता. परंतु, सामनेवाला याच्या बोलण्यामध्ये व वागण्यामध्ये काहीच फरक पडला नव्हता. रोज भांडण करणे, मारझोड करणे, शिव्या देणे हे प्रकार सामनेवाला याचे चालूच होते. गरोदरपणाच्या तिसऱ्या महिन्यात अर्जदार घरामध्ये काम करत असताना सामनेवाला हा दारु पिऊन घरी आला व अर्जदार हिला शिव्या देऊन "तुला काहीच येत नाही. तुझ्यासोबत लग्न करुन मला पश्चाताप झाला आहे." असे म्हणून मारझोड करु लागला. परंतु, अर्जदार हिचा प्रेमविवाह असल्यामुळे सदर गोष्टी ती कोणालाही सांगु शकत नव्हती.

५. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, गरोदरपणाच्या सातव्या महिन्यात दि.१२.०४.२०१९ रोजी अर्जदार ही बाळंतपणासाठी माहेरी गेली व दि.१८.०६.२०१९ रोजी कुडाळ येथील सरकारी दवाखान्यात अर्जदार हिला मुलगा झाला. त्यावेळी सामनेवाला हा अर्जदार हिला पाहणेस देखील आला नव्हता. अर्जदार व सामनेवाला यांच्या मुलाचे बारसे हे अर्जदार हिचे माहेरी करण्यात आले. सदर बारशाचा सर्व खर्च अर्जदार हिचे आई–वडिलांनी केला आहे. त्यानंतर २ महिन्यांनी सामनेवाला हा अर्जदार हिला मुलासहित आपल्या घरी घेऊन आला. घरी गेल्यानंतर काही दिवस चांगले गेले. परंतु, काही दिवसांनी सामनेवाला याने अर्जदार हिला रोज दारु पिऊन येऊन मारझोड करणे, शिव्या देणे, अर्जदार हिचे आई–वडिलांना शिव्या देणे तसेच धमक्या देणे हे प्रकार चालूच ठेवले.

६. अर्जदार हिचे पुढे असे कथन आहे की, दि.१५.११.२०१९ रोजी सामनेवाला हा

दारु पिऊन घरी आला व अर्जदार हिचेकडे पैशाची मागणी करु लागला. तेव्हा अर्जदार हिने पैसे देण्यास नकार दिल्याने सामनेवाला याने अर्जदार हिला शिवीगाळ करुन, मारझोड करुन, "तु माझ्या घरात राहायचे नाहीस, मी तुला मारुन टाकेन." अशी धमकी दिली व अर्जदार हिला घराबाहेर काढले. त्यावेळी अर्जदार हिचे वडील अर्जदार हिला घेऊन माहेरी आले. तेव्हापासून अर्जदार ही आपल्या माहेरी राहते. सामनेवाला हा डंपर चालक असून, त्यापासून त्याला दरमहा २५,०००/– रुपये एवढे उत्पन्न मिळते. याउलट अर्जदार ही स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे. तिला तिच्या वडिलांवर ओझे बनुन रहावे लागत आहे. त्यामुळे अर्जदार हिने सामनेवाला यांचेकडून दरमहा रक्कम रुपये १०,०००/– (दहा हजार रुपये मात्र) पोटगी स्वरुपात तसेच नुकसान भरपाई खर्च रक्कम रुपये ५,०००/–(पाच हजार रुपये मात्र) व अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/–(पाच हजार रुपये मात्र) मिळण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

**७.** प्रस्तुतकामी सामनेवाला यास पुरेशी संधी देऊनही सामनेवाला याकामी हजर झाले नसल्यामुळे त्यांचेविरुध्द माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दि.३०.०३.२०२६ रोजी सदरचा अर्ज सामनेवालाविरुध्द एकतर्फा चालविणेचा आदेश निशाणी क्र.१ वर पारीत केला आहे.

८. अर्जदार यांचे कथन, अभिलेखावरील दाखल कागदपत्रे यावरुन खालील मुद्दे उपस्थित झाले असुन, त्यावरील निष्कर्ष मी खालील कारणांसहित देत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | सामनेवाला यांनी अर्जदार हिचे पालन–पोषण करण्यास नकार दिला व दुर्लक्ष केले आहे काय ? | **होय.** |

| | | |
|---|---|---|
| २. | अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ आहे काय ? | **होय.** |
| ३. | सामनेवाला याचे अर्जदार हिला पोटगी देणेकरीता पुरेसे उत्पन्न आहे काय ? | **होय.** |
| ४. | अर्जदार हिस पोटगी मिळणेस पात्र आहे काय ? असल्यास किती ? | **अंशतः होय, २,०००/– पोटगी मंजूर.** |
| ५. | अर्जदार हिस अर्जाचेकामी आलेला खर्च मिळणेस पात्र आहे काय ?असलेस किती ? | **अंशतः होय, २,०००/– अर्जाचा खर्च मंजुर** |
| ६. | अर्जदार हिस नुकसानभरपाई मिळणेस पात्र आहे काय? असलेस किती ? | **अंशतः होय, २,०००/– नुकसान भरपाई मंजुर** |
| ७. | आदेश काय? | **अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.** |

**–::– कारणमिमांसा –::–**

**<u>मुद्दा क्र.१ ते ३ करीता</u>:–**

**९.** वरील तिन्ही मुद्दे एकमेकांशी संबंधीत असल्याने व एकमेकांवर अवलंबून असल्यामुळे पुराव्यातील पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी तिन्ही मुद्यांचे विवेचन एकत्रित करत आहे.

**१०.** अर्जदार हिने तिचे अर्जाचे पुष्ठ्यर्थ स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.६ कडे दाखल केलेले आहे. अर्जदार हिने पुरावा बंदची पुरशिस निशाणी क्र.७ लगत दाखल केली आहे.

**११.** अर्जदार हिचे विधिज्ञ श्री. आर.डी.बिले यांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्जदार व सामनेवाला यांचा विवाह दि.१४.०८.२०१८ रोजी झालेला आहे. अर्जदार हिने प्रस्तुत कामामध्ये सामनेवाला यांचेकडून पोटगी मिळण्यासाठी विनंती केलेली आहे. सामनेवाला हे अर्जदार हिचे कोणतेही पालन–पोषण करत नाहीत. सामनेवाला यांनी अर्जदार हिचा स्वतःहून स्विकार करणेस नकार दिलेला आहे. करीता अर्जदारतर्फे विधिज्ञ यांनी अर्जदार हिस सामनेवाला

यांचेकडून रक्कम रुपये १०,०००/– दरमहा पोटगी तसेच, प्रस्तुत नुकसानभरपाई खर्च रक्कम रुपये ५,०००/– व अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/– मिळण्याची विनंती केलेली आहे.

**१२.** अर्जदार हिने प्रस्तुतच्या अर्जामध्ये सामनेवाला यांचेकडून रक्कम रुपये १०,०००/– इतकी दरमहा पोटगी तसेच नुकसानभरपाई खर्च रक्कम रुपये ५,०००/– व अर्जाच्या खर्चाची रक्कम रुपये ५,०००/– मिळणेबाबत विनंती केलेली आहे. त्यामुळे अर्जदारने केलेल्या मागणी नुसार संबंधीत कायद्यातील तरतुद पाहणे गरजेचे आहे. **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४** चा विचार करता, *"स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ असल्यास पत्नीला अथवा अपत्याला आर्थिक मदत देण्यास न्यायालयाला आदेश पारीत करता येईल."*

**१३.** अर्जदार हिने स्वतःचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र (नि.क्र.६) दाखल करुन मुळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. त्यामुळे याठिकाणी मी सदर कथनांची पुनरावृत्ती टाळते. प्रस्तुतकामी सामनेवाला यास पुरेशी संधी देऊन देखील सामनेवाला यांनी अर्जदार हिचे अर्जातील व प्रतिज्ञापत्रातील कथने आपले म्हणणे देऊन अथवा उलटतपास घेऊन नाकारलेले नसल्यामुळे सदरची अर्जदार हिची कथने विनाआव्हानित राहिलेली आहेत. अर्जदार हिने तिचे सरतपासामध्ये तिचेवर होणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या विविध विधानांचे विवेचन केले आहे. तसेच, सामनेवाला यांचेकडून त्यांना होणाऱ्या शारीरिक, मानसिक व आर्थिक त्रासाबाबत कथने केली आहेत. यावरुन, अर्जदार ही सामनेवालासोबत न राहण्यास संयुक्तीक कारण असल्याचे अर्जदार हिचे पुराव्यावरुन दिसून येते. अर्जदार हिने तिचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रातील परिच्छेद क्र.०९ मध्ये दि.१५.११.२०१९ रोजी सामनेवाला याने दारु पिऊन पैशाची मागणी केली व पैसे देण्यास अर्जदार हिने नकार दिल्यामुळे सामनेवाला याने अर्जदार हिला शिवीगाळ तसेच मारहाण

करुन घराबाहेर काढले. यावरुन असे दिसून येते की, सामनेवाला यांनी अर्जदार हिचा कोणत्याही कारणांशिवाय त्याग केला आहे. त्यामुळे अर्जदार हिला सामनेवालासोबत न राहण्याचे कारण सबळ आहे.

**१४.** दि.१५.११.२०१९ पासून अर्जदार ही सामनेवालापासून विभक्त राहत असल्याचे पुराव्यांवरुन दिसून येते. तसेच सदर काळात सामनेवाला यांनी अर्जदार हिच्या पालन–पोषणाची जबाबदारी घेतली, असा कोणताही पुरावा सामनेवालातर्फे अभिलेखावर दाखल नाही. त्यामुळे, सामनेवाला यांनी अर्जदार हिचे उदरनिर्वाहाकडे तसेच तिला अन्न, वस्त्र व इतर मुभलक सुविधा पुरविणेस सामनेवाला यांनी कसुर केल्याचे अर्जदार हिने सिध्द केले आहे.

**१५.** अर्जदार हिने सरतपासाचे शपथपत्रामध्ये अर्जदार हिस कोणतेही उत्पन्नाचे साधन नसल्याने अर्जदार स्वतःचा उदरनिर्वाह करणेस असमर्थ असल्याचे शपथेवर सांगितले आहे. याउलट सामनेवाला हा डंपर चालक असून, त्यापासून दरमहा रक्कम रुपये २५,०००/– कमवत असल्याचे शपथेवर सांगितले आहे. सामनेवाला यांनी अर्जदाराच्या अर्जातील व सरतपासातील कथने नाकारलेली नसल्यामुळे सदरची कथने ही सामनेवाला यांना मान्य असल्याचे दिसून येते. अर्जदार हिने सामनेवाला यास दरमहा नेमके किती उत्पन्न मिळते याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. त्यामुळे सामनेवाला यास नेमके किती उत्पन्न मिळते याबाबत साशंकता निर्माण होते. अर्जदार ही सामनेवाला यांची पत्नी आहे ही बाब दाखल पुराव्यावरुन स्पष्ट होते. सामनेवाला हा अर्जदार हिचा पती असल्याने अर्जदार हिचे पालन–पोषण करण्याची तसेच योग्य प्रकारे उदरनिर्वाहाची सोय करण्याची जबाबदारी सामनेवाला याची आहे. तसेच पत्नी म्हणून तिच्या प्राथमिक गरजा भागविणे व तिच्या उदरनिर्वाहाची सोय करणे हे पती म्हणून सामनेवाला याचे नैतिक कर्तव्य आहे. सबब, उपरोक्त विवेचनाप्रमाणे

सामनेवाला यांचेकडून अर्जदार हिस वाजवी रक्कम मिळणे न्यायोचित ठरेल. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे उत्तर **होकारार्थी** देत आहे.

**<u>मुद्दा क्र.४ ते ६ बाबतः</u>–**

**१६.** मुद्दा क्र.१ ते ३ च्या निष्कर्षाच्या अनुषंगाने, अर्जदार हिस उत्पन्नाचे साधन नसल्याने अर्जदार स्वतःचे पालन–पोषण करण्यास असमर्थ आहे. अर्जदार यांच्या पुराव्यातील शपथपत्रामध्ये परिच्छेद क्र.१ मधील मजकुरानुसार अर्जदार व सामनेवाला यांना मुलगा भावेश नावाचा मुलगा असल्याचे कथन केले आहे. त्यामुळे चालू राहणीमानाचा विचार करता, अर्जदार हिच्या दैनंदिन उदरनिर्वाहाकरिता व पालन–पोषणाकरीता अर्जदार हिला सामनेवाला यांचेकडून **रक्कम रुपये २,००० /– (दोन हजार रुपये मात्र)** पोटगी मिळणेस पात्र आहे.

**१७.** अर्जदार हिने प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये ५,०००/– व नुकसानभरपाई म्हणून रक्कम रुपये ५,०००/– सामनेवाला यांचेकडून मिळावे अशी विनंती केली आहे. प्रस्तुत अर्जाचा विचार करता, प्रस्तुतचा अर्ज हा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १४४ अंतर्गत दाखल केल्याचे दिसून येते. त्यामुळे अर्जदार हिस प्रस्तुतकामी कोणतीही न्यायालयीन शुल्क नाही. परंतु, अर्जदार हिस प्रस्तुतकामी न्यायलयीन शुल्क व्यतिरीक्त इतर खर्च आला असल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अर्जदार हिस अर्जाचा खर्च **रक्कम रुपये २,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** सामनेवाला यांचेकडून देण्याचा आदेश करणे न्यायोचित होईल. सामनेवाला यांनी अर्जदार हिस संयुक्तीक कारणांशिवाय घरातून बाहेर काढल्याचे अर्जदार हिने शपथेवर कथन करुन शाबीत केले आहे. त्यामुळे, अर्जदार हिस झालेल्या मानसिक, शारीरिक त्रासाबाबत नुकसानभरपाई म्हणून सामनेवाला यांचेकडून नुकसानभरपाई रक्कम देणे न्यायोचित दिसून येते. त्यामुळे सामनेवाला यांच्या उत्पन्नाचा विचार करता अर्जदार हिस

झालेल्या मानसिक, शारिरीक त्रासाकरीता नुकसानभरपाई म्हणून अर्जदार हिला र**क्कम रुपये २,००० /– (दोन हजार रुपये मात्र)** देणे न्यायोचित दिसुन येत आहे. सबब, उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता मी मुद्दा क्र.४ चे उत्तर **अंशतः होकारार्थी** नोंदवून मुद्दा क्र.५ चे उत्तर **अंशतः होकारार्थी** नोदंवते व मुद्दा क्र.६ चे उत्तर **अंशतः होकारार्थी** नोंदवते. तसेच मुद्दा क्र.७ चे उत्तर दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहेः–

–::– **आदेश** –::–

**१.** प्रस्तुतचा अर्ज अंशतः मंजूर करणेत येत आहे.

**२.** सामनेवाला यांनी अर्जदार हिस दरमहा रक्कम रुपये **२,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** पोटगी अर्ज दाखल तारखेपासून द्यावे.

**३.** सामनेवाला यांनी अर्जदार हिस प्रस्तुत अर्जाचा खर्च रक्कम रुपये **२,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** देणेचा आहे.

**४.** सामनेवाला याने अर्जदार हिस रक्कम रुपये **२,०००/– (रुपये दोन हजार मात्र)** इतकी नुकसानभरपाई देणेची आहे.

**५.** ज्या मागण्या मान्य नाहीत त्या अमान्य समजण्यात याव्यात.

**६.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व सामनेवाला यांना मोफत देणेत यावी.

सही/–

[ एन.ए.बकरे ]

दिनांकः–०६/०७/२०२६.

न्यायदंडाधिकारी वर्ग–१, कुडाळ